Add

११५१५

६५

# महाराष्ट्र शासन

क्रमांक - संकीर्ण २००४/१७१५/प्र.क्र.१८९/७४/स्वासैक १

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २९ डिसेंबर,२००४.

जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड 3 JAN 2005 शाखा प्रति

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी.

विषय - भूमिगत प्रवर्गातील अर्जदार स्वातंत्र्य सैनिकांकडून <u>घ्यावयाच्या कागदपत्रांबाबत.</u>

सदर प्रकरणी आपणास कळविण्यांत येते की, भारतीय स्वातंत्र्य लढा हैद्राबाद मुक्ती संग्राम इत्यादी लढयांमध्ये भूमिगत म्हणून काम केलेल्या स्वातंत्र्य सैनिकांचे निवृत्ती वेतन मिळण्यासाठी अर्ज शासनास प्राप्त होत असतात. अशा प्रकरणांची छाननी करताना शासनास असे आढळले आहे की, बरेचसे अर्जदार दिनांक ४ जुलै,१९९५ च्या आदेशाप्रमाणे आवश्यक असलेले सर्वच कागदोपत्री पुरावा शासनास सादर करीत नाहीत, फक्त स्वातंत्र्य सैनिकांचे स्वतःचे प्रतिज्ञापत्र आणि त्यांना ओळखणा-या इतर दोन स्वातंत्र्य सैनिकांची शपथ पत्र सादर केली जातात. वास्तविक पाहता फक्त एवढाच कागदोपत्री पुरावा पेन्शन मंजुरीकरिता पुरेसा ठरत नाही. तरी या परिपत्रकाद्वारे आपणास कळविण्यांत येते की, भूमिगत प्रवर्गवारीमधून जे अर्ज प्राप्त होतील त्या सर्व अर्जाच्याबाबतीत वर उल्लेख केल्याप्रमाणे तीन शपथपत्रांबरोबरच भूमिगत म्हणून कार्य केल्याबद्दलचा दिनांक ४ जुलै,१९९५ च्या आदेशात उल्लेख केल्याप्रमाणे सदर शासन निर्णयाच्या परि.३ मधील (इ) या भूमिगत प्रवर्गांतर्गत निवृत्ती वेतन मंजूरीसाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता/पुरावे अर्जदाराने सादर करणे आवश्यकच आहे. असे कागदोपत्री पुरावे अर्जदाराने त्यांच्या अर्जासोबत सादर केले नसतील तर अशी प्रकरणे स्पष्टपणे नाकारुन तसा स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनास सादर करावा.

२. भूमीगत स्वातंत्र्य सैनिक म्हणजे जी व्यक्ती स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतल्यामुळे ब्रिटीश सरकारनी दोषी ठरविल्यामुळे किंवा Arrest warrant जारी केल्यामुळे भूमीगत राहिली व ज्या व्यक्तीस (अ) दोषी असल्याचे घोषित करण्यात आले होते. (ब) किंवा ज्यांच्या अटकेसाठी बक्षीस जाहीर करण्यात आले होते. (क) किंवा स्थानबध्दतेचे आदेश काढण्यात आले होते व ती व्यक्ती भूमीगत झाल्यामुळे ते संबंधित व्यक्तीवर बजावता आले नव्हते.

ज्या व्यक्ती स्वतःहून (Voluntarily)भूमीगत झाल्या होत्या अथवा नेत्यांच्या आदेशावरुन भूमीगत झाल्या होत्या त्यांना भूमीगत स्वातंत्र्य सैनिक म्हणता येणार नाही.

३. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, भूमीगत प्रवर्गामधून जे अर्जदार शासनाकडे अर्ज करतात ते भूमीगत चळवळीमध्ये सर्वसाधारणपणे पुढील प्रमाणे काम केल्याचा दावा करीत असतात.

3/10/1

464 10/1/05

WS 15 10-1-05

१) शिंदीची झाडे तोडली,

२) लढयातील सैनिकांना डबे पुरविले,

३) हॅन्डबिल छापली व लोकांमध्ये वाटली,

४) बॉम्ब तयार करण्याच्या व तत्सम साहित्याची ने-आण केली.

वरील प्रमाणे घटनांचा अगदी मोघम उल्लेख संबंधित अर्जदार करीत असतात. त्या संदर्भात विवक्षीत घटना, ठिकाणे आणि तारखांचा उल्लेख अर्जदार करीत नाहीत आणि त्याबाबतचा सबळ पुरावाही सादर करीत नाहीत. काही अर्जदार असा दावा करतात की, त्यांनी भूमिगत लोकांना मदत केली अशा व्यक्तींना भूमिगत म्हणता येणार नाही.

वास्तविक पाहता वर नमुद केलेल्या प्रकारची कामे कोणतीही व्यक्ती भूमीगत न राहता सर्वसामान्य माणसाप्रमाणे राहून सुध्दा करु शकतो. ही कामे करण्यासाठी भूमीगत राहण्याची मुळीच आवश्यकता नाही. ज्यावेळी अर्जदाराविरुध्द पकड वॉरंट, स्थानबद्धतेचे आदेश अथवा तत्सम आदेश निघालेले असतील तेव्हाच त्याने भूमीगत राहून काम केले असणे तर्कसंगत वाटते. ज्या प्रकरणांमध्ये वरील प्रमाणे आदेश अर्जदाराविरुध्द निघाल्याचा पुरावा अर्जदार सादर करु शकत नसेल आणि तरीही तो भूमीगत म्हणून काम केल्याचा दावा करीत असेल तर अशा प्रकरणी अर्जदाराचा दावा निश्चितच संशयास्पद ठरतो. त्यामुळे यापुढे भूमीगत प्रवर्गवारीतील प्रकरणे आपणाकडे प्राप्त झाल्यास वरील प्रमाणे मुद्यांचा प्रकरणाची छाननी करताना सखोलपणे विचार करण्यात यावा आणि त्यानंतरच अशी प्रकरणे योग्य त्या शिफारशीसह शासनाकडे पाठविण्याची दक्षता घ्यावी.

४. या अनुषंगाने येथे असेही नमुद करण्यांत येते की, जर एखाद्या अर्जदाराने भूमिगत म्हणून काम केल्याचा दावा केला असेल तर त्याला भूमिगत म्हणून कां काम करावे लागले,व त्याबाबत त्यावेळचे जिल्हा दंडाधिकारी किंवा इतर तत्सम प्राधिका-यांकडून मिळालेले काही कागदोपत्री पुरावे अर्जदाराकडे उपलब्ध आहेत किंवा कसे याची माहिती देण्यात यावी. अर्जाच्या नमुन्यातही "भूमिगत राहून कां काम करावे लागले?" हे वाक्य अंतर्भूत करावे.

५. अर्जदाराची शिक्षा अथवा स्थानबध्दता, अथवा तो भूमिगत राहिल्याप्रकरणी उर्दू कागदपत्रे / फसली सनाच्या तारखा यांचे पुरावे अर्जदार नमूद करीत असल्यास त्यांचे भाषांतर उर्दू जाणकार व्यक्तींकडून (न्यायालयीन भाषांतरकार अथवा एखाद्या विद्यापीठातील संबंधित तज्ञ व्यक्ती ) करणे आवश्यक असून त्यासोबत भाषांतर करणा-या व्यक्तीचे प्रमाणपत्र घेण्यात यावे. प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

६. या तपशिलासह अर्जदाराकडून भूमिगत म्हणून काम करावे लागल्याबाबतचे सविस्तर समर्थन प्राप्त करुन घ्यावे आणि नंतरच असे प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यांत यावेत.

( सु.रा.चव्हाण )
उप सचिव.